## महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

## संशोधन विश्लेषक या कंत्राटी सेवांसाठी जाहिरात.

मनोरंजन क्षेत्राशी संबंधित निरनिराळ्या क्षेत्रात होणाऱ्या घडामोडींवर लक्ष ठेवून त्यावर अधिक माहितीचे संशोधन करून विजन **५०** या चित्रनगरीच्या मुख्य प्रकल्पासाठी तसेच विजन **२०४७** या राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च उद्दिष्ट स्फूर्तीसाठी संशोधनाची गुणवत्ता वाढवणे आणि धोरणात्मक निर्णयांसाठी आवश्यक संशोधनात्मक माहिती उपलब्ध करून देणे हे असेल जेणेकरून दोन्ही उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अंमलबजावणी अधिकाधिक प्रभावीपणे करता येणे शक्य होईल. या बाबींचे सखोल ज्ञान असणा-या उमेदवारांकडून खालील विवक्षित कामांसाठी मुलाखतीद्वारे कंत्राटी पद्धतीने ११ महिन्याच्या कालावधी करिता सेवा घेण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| अ. क्र | पद संख्या | अर्हता | पदाची विवक्षित कामे |
|---|---|---|---|
| १ | १ | १. मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२. मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील द्विपदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>३. मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून एम. फिल. पदवी (by research) असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>४. सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील संशोधनाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>५. महाविद्यालये किंवा विद्यापीठां मध्ये काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>६. संशोधन पद्धती आणि डेटा विश्लेषणाचे ज्ञान असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>७. **वयोमर्यादा:-** ४० वर्षांपर्यंत | १. महामंडळाच्या उद्दिष्टांनुसार संशोधन धोरण, संशोधनाची दिशा आणि प्राधान्यक्रम निश्चित करणे.<br>२. अल्पकालीन आणि दीर्घकालीन संशोधन आराखडा तयार करणे.<br>३. संशोधन प्रकल्पांची संकल्पना, नियोजन आणि अंमलबजावणी करणे.<br>४. संशोधन पद्धती (Methodology), डेटा संकलन आणि विश्लेषणासाठी तांत्रिक सहाय्य देणे.<br>५. संशोधन निष्कर्षांवर आधारित अहवाल, नोट्स, धोरणपत्रे (Policy Papers) आणि शिफारसी तयार करणे.<br>व्यवस्थापनाला निर्णय प्रक्रियेसाठी आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे.<br>६. मनोरंजन क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास करणे.<br>७. विविध स्रोतांमधून माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करणे.<br>८. संशोधन लेख, अभ्यास अहवाल, पुस्तिका, माहितीपत्रके आणि इतर प्रकाशने तयार करण्यासाठी सहाय्य करणे.<br>९. संशोधनाशी संबंधित दस्तऐवजांचे अभिलेखीकरण (Documentation) करणे.<br>१०. संशोधनाची गुणवत्ता, वस्तुनिष्ठता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करणे.<br>११. वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली इतर कामे. |

**अ. आवश्यक कौशल्ये:-**

१. शासन / निमशासकीय संस्थांच्या कार्यपद्धतींचे सखोल ज्ञान.
२. मराठी व इंग्रजी भाषेचे लेखी व मौखिक प्रभुत्व अनिवार्य.
३. संशोधन प्रक्रियेचे सखोल ज्ञान.
४. प्रभावी संवाद, समन्वय व करार वाटाघाटी कौशल्य.
५. नवीन संशोधन साधने आणि तंत्रज्ञानाची माहिती देणे.
६. विद्यापीठे, संशोधन संस्था, तज्ज्ञ, शासकीय व अशासकीय संस्थांशी समन्वय साधणे.
७. संस्थेच्या गरजेनुसार विशेष अभ्यास, सर्वेक्षण, परिणाम मूल्यांकन (Impact Assessment) आणि क्षेत्रीय अभ्यास (Field Studies) करणे.

**ब. वित्तलब्धी :-** रु.५०,०००/- (सर्व भत्यांसह) इतके मासिक मानधन अनुज्ञेय राहील.
क. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, साक्षांकित प्रतीसह विहीत नमुन्यात अचूक भ्रमणध्वनी नमूद करुन खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑन लाईन दि.२४.०७.२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नबोलविण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# संशोधन विश्लेषक या कंत्राटी सेवांसाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्र व्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई- मेल | |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | एकुण अनुभव | |
| ८ | इतर अर्हता | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी